# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

**अचूक वेध, अचूक बातमी**

मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

# पाटणला ३ दिवस महोत्सवात मनोरंजनाच्या कार्यक्रमांची मांदियाळी




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२७, पाटण (सातारा) :** पाटण महोत्सवात पाटणला तिन.दिवस करमनुकीच्या कार्यक्रमांचाही तडखा 'खेळ पैठणीसह, जगदंब फोक अख्यान व सामुहिक डान्स सादरीकरणासह सिनेअभीनेत्री कल्याणी नंदकिशोर सह सिनेअभिनेते समृद्धीबाबा जाधव यांचा 'हसण्यासाठी जन्म आपला' अशा नानाविध कार्यक्रमाचा पाटण तालुका वासियाना लाभ मिळणार.

कोयना एज्युकेशन सोसायटी व रोटरी क्लब पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२८ फेब्रुवारी ते २ मार्च पर्यंत पाटणला 'पाटण महोत्सव' या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवात भव्य प्रदर्शन व विक्री व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचाही समावेश करणेत आला आहे.

बाळासाहेब देसाई हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजच्या प्रांगणात या महोत्सवाचे संयोजन करणेत आले आहे. दरम्यान या महोत्सवात कृषी प्रदर्शनासह इतर संसार उपयोगी साहित्य व खाद्यपदार्थासह पुस्तकांचेही स्टॉल पहावयास मिळणार आहेत यात विविध महिला बचत गटांचेही खाद्यपदार्थ व वस्तुचे स्टॉल उभारले जाणार आहेत.

## पाटण महोत्सवात मनोंरजनाच्या कार्यक्रमांची मांदियाळी

महोत्सवात खास पाटण वासियांसाठी मनोरंजनाचा केंद्रबिंदू असलेल्या विविध करनमुकीच्या कार्यक्रमांचाही सहभाग करणेत आला आहे. दि.१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता लागिर झाल फेम कल्याणी नंदकिशोर यांचा महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' सायंकाळी ४ वाजता स्वरसह्याद्री ग्रुपचा संगित मैफिल व सायंकाळी ६ वाजता संगित लोकधारा प्रस्तुत लोकगितांवर अधाररित 'दि जगदंब फोक अख्यान' हा कार्यक्रम होणार आहे. दि. २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सामुहिक डान्स सादरीकरण हा लावणी कथक या नृत्यप्रकारावर आधारीत कार्यक्रम. व सायंकाळी ६ वाजता सिनेअभिनेते समृद्दी जाधव यांचा 'हसण्यासाठी जन्म आपला' हा बहारदार कार्यक्रम पहावयास मिळणार आहे.